संपादकीय नोंदः रजनीकुमार पंड्या हे नाव आपल्यासाठी नवीन नाही. 'चित्रलेखा'मध्ये त्यांनी 'कुंती'सारखी हृदयस्पर्शी कादंबरी लिहिली होती. त्यांचा साहित्यातला व्यासंग जसा दांडगा आहे तसाच चित्रपट क्षेत्राच्या इतिहासाचाही अभ्यास आहे. एका गैरफिल्मी नियतकालिकात 'फिल्माकाश' नावाचं सदर ते लिहित होते. यासाठी त्यांना पुरस्कारही मिळाला होता. 'जी'च्या वाचकांची चित्रपट क्षेत्राचा इतिहास जाणून घेण्याची इच्छा लक्षात घेऊन त्यांच्या लेखणीतून साकारलेली इतिहास ही मालिका आम्ही आता सुरू करत आहोत. हे सदर तुम्हाला आवडलं तर इतरांना आवर्जून त्याविषयी सांगा. कारण चित्रपटसृष्टीचा हा इतिहास अनेकांना अपरिचित असेल.

## वडिलांचा विरोध आणि मुलाचा जोशः

# न्यू थिएटर्सच्या स्थापनेची कथा

**त**माशा म्हणून हिणवल्या जाणाऱ्या चित्रपट क्षेत्राला बी.एन. सरकार यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यासाठी त्यांनी काय काय केलं त्याचा इतिहास.

□ रजनीकुमार पंड्या



बी. एन. सरकार

**अ**नेकदा असं होतं की मोठ्या बाता मारून जी गोष्ट साध्य होत नाही ती दुसऱ्या कोणाला तरी न बोलता सहजी जमते. आपल्या दैनंदिन जीवनात असे अनेक किस्से घडत असतात. चित्रपट सृष्टीतल्या अशा किश्श्यांची नोंद घेण्याचा हा एक प्रयत्न.

१९३०साली ३० डिसेंबर रोजी कोलाकात्याच्या चित्रा थिएटरमध्ये (जे आता मित्रा टॉकीज नावाने ओळखलं जातंय)चं उद्घाटन नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते झालं. त्यावेळी प्रसिद्ध बंगाली साहित्यिक शरदचंद्र चटर्जी यांच्या 'श्रीकांत'वर आधारित *श्रीकांत* हा मूकपट तिथे लागला होता. उद्घाटन समारंभाची बातमी तेव्हाच्या सगळ्या वर्तमानपत्रांतून छापून आली होती. विशेषतः इंग्रजी वर्तमानपत्रांतून तर त्याची प्रामुख्याने दखल घेतली गेली होती. त्यात लिहीलं होतं, 'या थिएटरचे मालक श्री बिरेंद्रनाथ सरकार आहेत. त्यांचे वडील नृपेंद्रनाथ सरकार हे बंगालचे ॲडवोकेट जनरल आहेत. आता प्रतिष्ठीत घरातली मुलंही अशा तमाशा व्यवसायात येऊ लागलीत.'

तशी नृपेंद्रनाथना आपल्या मुलाच्या या छंदाची थोडीफार कल्पना आली होती. पण त्याची अशी जाहीर वाच्यता होणं त्यांना अजिबात आवडलं नाही. त्यांनी ही बातमी लाल रेषेत वर्तुळ करून मुलाच्या तोंडावर फेकली. वडिलांच्या रागाचं कारण बिरेंद्रनाथांच्या लगेच लक्षात आलं. मात्र दोघांमध्ये एका शब्दाचाही वाद झाला नाही. फक्त नृपेंद्रनाथनी आपल्या नावाखाली आणि तमाशाचा व्यवसाय हे शब्द लाल रंगाने अधोरेखित केले होते.

त्याच वेळी बिरेंद्रनी निश्चय केला की हाच तमाशाचा व्यवसाय प्रतिष्ठीतांना आपल्या तोलामोलाचा वाटावा इतक्या उंचीवर नेऊन ठेवायचा. त्यासाठी त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य वाहून घेण्याचं ठरवलं. इतकंच नाही तर आपल्या वडिलांचा हा दृष्टीकोनही बदलायचा विडा उचलला.

त्यानंतर दोन महिन्यांनंतर म्हणजे १९३१च्या १० फेब्रुवारी रोजी त्यांनी भारतीय चित्रपट सृष्टीत माईलस्टोन ठरावा अशा द न्यू थिएटर्स लि. नावाच्या

कंपनीची स्थापना केली.

बिरेंद्रनाथ ऊर्फ बी.एन. सरकार यांनी एका ठिकाणी लिहीलं होतं, 'वडिलांच्या त्या दिवसाच्या मूक विरोधाने माझं सगळं जीवनच बदलून गेलं. मी त्याच क्षणी माझं ध्येय नक्की केलं. म्हणजेच माझ्या कारकीर्दीला दिशा देण्याचं श्रेय माझ्या वडिलांना जातं हे नक्की.'

५ जुलै, १९०१ रोजी बिहारच्या भागलपूर या ठिकाणी बी.एन. सरकार यांचा जन्म झाला. ते सिव्हिल इंजिनीयर होते. १९२३मध्ये लंडनच्या सिटी ॲण्ड गिल्ड्स इंजिनियरिंग कॉलेजमधून त्यांनी प्रथम श्रेणीत डिग्री घेऊन कोलकात्याला परतले. इथे आल्यावर त्यांनी एका इंजिनीयरिंग कंपनीचीही स्थापना केली होती. त्या कंपनीच्या ऑफीसच्या जागेत पी.एन राय हे एक भागीदार होते. एकदा बिरेंद्रनी आपल्या या भागीदाराचा फोटो बॉम्बे टॉकिजचे संस्थापक हिमांशू राय यांच्याबरोबर पाहिला आणि त्यांना कुतूहल वाटलं. त्यावेळी त्यांना समजलं की पी.एन. राय हे हरेन घोष यांचे मित्र असून त्यांच्यामुळेच हिमांशू रायच्या संपर्कात आले होते. त्यावेळी प्रसिद्ध नृत्यकार उदयशंकर यांच्या कार्यक्रमांचे आयोजक म्हणून ते काम करत होते, त्याचबरोबर ते *बुकर बोजी* नावाचं एक चलतचित्रही बनवत होते. बी.एन.ना या क्षेत्रात रुची होती. राय यांच्या ओळखीने त्यांनी संधी मिळेल तेव्हा शूटिंगला हजेरी लावायला सुरुवात केली. त्यातून त्या चलतचित्राचे कॅमेरामन नितीन बोस(जे मागाहून न्यू थिएटर्सचे एक आधारस्तंभ ठरले)शी त्यांचा परिचय झाला. बी.एन. सरकारना चित्रपट निर्मितीत रुची वाटू लागली होती. मग त्यांनी १९२८मध्ये पी.एन.राय यांच्याबरोबर चहा घेता घेताच 'इंटरनॅशनल क्राफ्ट' नावाची निर्मिती संस्था सुरू केली. आपल्या परंपरावादी वडिलांचा या गोष्टीला विरोध होणार याचीही त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी घरात याविषयी वाच्यता केली नाही. पण अशा गोष्टी फार काळ लपून तर राहात नाहीत ना? वडिलांच्या कानावर हे प्रकार गेलेच. पण त्यांनी मुलाच्या कृत्यांकडे काणाडोळा केला. याच वेळी बी.एन. सरकार यांच्या कंपनीने अगदी कमी खर्चात म्हणजे दहा हजार रुपयांत *चोर कांटा* नावाचा एक मूकपट बनवला. त्यानंतर *चाषर मेये*ची निर्मिती केली. त्यावेळी स्वतःचा स्टुडियो नसल्याने चित्रपटाचं बरचसं शूटिंग आऊट डोअरला करावं लागलं. चारु रॉय आणि पी.सी.रॉय अनुक्रमे त्याचे दिग्दर्शक होते. दोन्ही चित्रपट तयार झाले खरे, पण त्यांच्यासाठी थिएटर मिळवणं ही मोठी अडचण होती. कारण त्यावेळी फटाफट मूकपट बनत होते. मूकपट जास्त थिएटर्स कमी अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

अशा परिस्थितीत बी.एन. सरकार यांनी स्वतःचं थिएटर सुरू करण्याचा विचार केला. त्याच्याच उद्घाटन प्रसंगी सुभाषचंद्र बोस यांना पाचारण करण्यात आलं होतं. प्रसिद्ध ॲटर्नी जनरल एन.एन. सरकार यांचा हा मुलगा आहे, असा विचार करून सुभाषबाबूही उद्घाटन प्रसंगाला यायला तयार झाले.

वडिलांना मात्र मुलाच्या या उचापती अजिबात मान्य नव्हत्या. पण आता त्याला दडपशाही करून गप्पही बसवता येणार नव्हतं. मुख्य म्हणजे आता बी.एन.चे या क्षेत्रात नवे नवे संबंध जुळत होते, ओळखी वाढत होत्या. *चोर कांटा* आणि *चाषर मेये*ची निर्मिती झाली त्याच सुमारास या सिनेमांना बाहेरून संगीत देणाऱ्या हरेनदांनी कोलकाता रेडीयोवरून दोन संगीतकारांना समजावून या क्षेत्रात आणलं. त्यांची नावं होती, पंकजकुमार मल्लिक आणि रामचंद बोराल. ही माणसंही काही तमाशातली नव्हती. पंकजदा तर प्रसिद्ध बार्कमायर कंपनीत वरच्या पदावर नोकरी करणाऱ्या अमलदाराचे सुपूत्र होते. तर रायचंद बोराल स्वतः आकाशवाणीवर असिस्टंट प्रोग्रॅम डायरेक्टर होते.

या दोघांबरोबरच आणखीही एका नवोदिताचा परिचय झाला होता, त्यांचं नाव होतं अर्देशर इराणी. हे महाशय खरोखरच महा-आशय होते. मूकपटांच्या जागी बोलपट आणण्यासाठी त्यांची धडपड चालू होती. १९३० च्या दशकात आता चित्रपटांमध्ये ध्वनीचाही वापर करण्यात येऊ शकेल अशी वातावरण निर्मिती करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. बी.एन. सरकार यांनी आपल्या वडिलांची समजूत काढली आणि मुंबईला यायची तयारी केली. आता त्यांना मूकपटात ध्वनीचा वापर करून ते बोलपटात रुपांतरित करण्याचं तंत्र शिकून घ्यायचे वेध लागले होते. त्यावेळी इराणी *आलम आरा* या पहिल्या बोलपटाच्या तयारीत व्यग्र होते. तरीही त्यांनी या तिशीतल्या तरुणाची जिद्द आणि जिज्ञासा पाहून त्यांना वेळ द्यायची तयारी दाखवली.


आर. सी. बोराल

आता इतकं सहकार्य मिळतंय म्हटल्यावर बी.एन. मागे थोडेच हटणार होते? त्यांना आता दिशा मिळाली होती, मार्ग मिळाला होता आणि मार्गदर्शकही. कविवर्य टागोर आणि शरदबाबू यांच्यासारख्या महानुभावांचं पाठबळ होतंच.त्यावेळी मग बी.एन. सरकार यांना चित्रपटांची तमाशा ही इमेज बदलण्याचा आपला जुना निश्चय आठवला.

चित्रपट हे माध्यम साहित्य आणि संस्कृती संवर्धक पूरक माध्यम बनेल असे प्रयत्न करायचं त्यांनी ठरवलं. ही गोष्ट त्यांनी आपल्या वडिलांच्या गळीही उतरवली. इतकंच नाही तर त्यांच्याकडून चित्रपट निर्मितीसाठी अर्थसहाय्यही मिळवलं. कोलकात्याच्या टोलेजंग भागात त्यांनी जमीन खरेदी केली आणि १९३१ रोजी 'द न्यू थिएटर्स' नावाच्या निर्मिती कंपनीची तिथे स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना मनापासून आशिर्वाद दिले. त्यांच्या इमारतीचं बांधकाम होत असताना ते तिथे स्वतः लक्षही देऊ लागले. यावेळी मूकपट बोलते करण्यासाठी आवश्यक ते साहित्य घेण्याची नितांत गरज होती. या यंत्रसामुग्रीबरोबरच त्याचं तंत्र जाणणारे साऊंड इंजिनीयरचीही गरज होती. बऱ्याच वाटाघाटी केल्यानंतर बी.एन. सरकार यांनी अमेरिकेच्या रिन्को कंपनीकडून ही यंत्रसामुग्री मागवली. त्यासाठी वडिलांच्या नावाचाही थोडासा वापर करावा लागला होता. इतकंच नाही तर त्याच

कंपीनचे निष्णात इंजिनीयर डब्ल्यू. ए. डेमिंग यांना आपल्या साऊंड रेकॉर्डिस्टना प्रशिक्षण देण्यासाठी नियुक्त केलं. त्यांनी मुकूल बोस, बानी दत्त आणि लोकेन बोस यांच्यासारखे कुशल साऊंड रेकॉर्डिस्ट तयार केले.

बी.एन. सरकारनी अगदी पहिल्यापासूनच आपल्या निर्मिती संस्थेत शूटिंग, एडिटिंग आणि रेकॉर्डिंगच्या सगळ्या सोयी उपलब्ध करून या क्षेत्राला एक व्यावसायिक रुप दिलं. त्यांच्याकडे काम करायला चांगले कलाकार आणि तंत्रज्ञ उत्सुक राहू लागले. अमर मलिक, पंकज मलिक, रायचंद बोराल, आय.ए.हाफिजी, युसूफ मूलजी, उमाशशी आणि कुंदनलाल सायगल यांच्यासारखे अनेक रथी-महारथी त्यांच्या कंपनीत दाखल झाले. शरदबाबूंनी त्यांच्या 'देना पावना'वर आधारितं चित्रपट बनवायची परवानगी दिली, तर कविवर्य टागोरांनी आपल्या गीत-संगीताचा वापर करण्याची अनुमती दिली. इतक्या मोठ्या लोकांचं योगदान आहे म्हटल्यावर त्यांना आपल्या निर्मिती संस्थेचं मानचिन्ह(लोगो) असावं असं वाटू लागलं. बी.ए. सरकारनी त्यासाठी अनेक मान्यवरांशी संपर्क साधला. अखेरीस त्यांना उपनिषदातलं एक चरण मिळालं त्यावरून पंडीत परशुराम ऊर्फ राजशेखर बसू यांनी 'जीवतां ज्योतिरेतु छायाम्' अशी ओळ तयार केली. याचा अर्थ अगदी साधा होता, 'छायेवर प्रकाश टाकला तर ती सजीव होते.' चित्रपट माध्यमासाठी यापेक्षा सूचक अर्थाची दुसरी ओळच सापडली नसती. नंतर १९३४मध्ये पंकज मलिक यांच्या हजेरीत अशाच एका पंडीत सुनीतिकुमार यांनी याची दुसरी ओळही दिली. आणि याप्रमाणे श्लोक तयार झाला-

मुखरां प्रकटित मनुजमायाम्, विधृत-नाटक-निसर्ग कायाम्, प्रसुतां च धवल यवनिकायां जीवताम् ज्योतिरेतु छायाम्.

गोलाकार द्विरेखांकित अशा लोगोवर वरच्या बाजूला 'द न्यू थिएटर्स लि.' असं इंग्रजीत नाव आणि खाली 'जीवता ज्योतिरेतु छायाम्'चं सूत्र आणि मध्ये चित्कार करणाऱ्या हत्तीचं डोकं असा लोगो तयार झाला. प्रसिद्ध कलाकार जतिन सेन यांनी तो तयार केला होता. भारतीय चित्रपट व्यवसायाच्या इतिहासात अमर झालेल्या या बॅनरखाली १९५४ पर्यंत म्हणजे या बॅनरच्या अखेरपर्यंतच्या तेवीस वर्षांच्या कालावधीत ५३ हिंदी आणि ५६ बंगाली चित्रपटांची निर्मिती करण्यात आली. खरोखरच बी.एन. सरकार यांनी चित्रपट म्हणजे तमाशा हे जनमत बदलून या क्षेत्राला एका प्रतिष्ठीत पेशाचं स्वरूप प्राप्त करून दिलं. आपल्या वडिलांना मनोमन दिलेला शब्द पाळला. १९३१मध्ये पडद्यावर आलेला *देना पावना* हा शरदबाबूंच्या कादंबरीवर आधारित होता. त्यानंतर १९३२ पासून त्यांनी हिंदी चित्रपट निर्मितीलाही सुरुवात केली.

**(चंदेरी पडद्यावरचा सोनेरी इतिहास यापुढे क्रमशः)**

विशेष



# ॲनिमेशनच्या

**का**हीतरी नवं करण्याचा, प्रेक्षकांना वेगळं काहीतरी देण्याचा प्रयत्न बॉलीवूडमध्ये सतत चालू असतो. नव्या दमाचे लोक यात आल्याने या पिढीने अनेक प्रयोग करण्याचा जणू सपाटाच लावला. असाच एक प्रयत्न म्हणजे चित्रपटात ॲनिमेशन तंत्राचा वापर. तसा तो बराच आधीपासून होत होता. पण आता ॲनिमेटेड पात्रांना कथेत विशिष्ट स्थान असतं, काही वेळा त्यांची स्वतंत्र कथाही असते. तर कधीकधी संपूर्ण चित्रपट या ॲनिमेशन तंत्रानेच बनवला जातो.

*हम तुम*चे दिग्दर्शक कुणाल कोहली यांच्या मते, 'ॲनिमेशन हे दर्शकांना खिळवून ठेवणारं तंत्र आहे. सध्या त्याचा हलक्या फुलक्या पात्रांसाठी उपयोग केला जातोय. पण भविष्यात ॲनिमेटेड पात्रांच्या माध्यमातून गंभीर विषयही हाताळले जातील. कथेच्या प्रवाहीपणाला पूरक ठरणारी ॲनिमेटेड पात्रं चित्रपटात सहज सामावून घेतली जातात.' सूरज बडजात्याच्या *मैं प्रेम की दिवानी हूं*मध्ये ॲनिमेशन उपयोगी ठरलं नाही. याचं कारण त्यांचा कथेच्या मुख्य प्रवाहात समावेश नव्हता. मात्र *हम तुम* आणि *शादी के लड्डू*मध्ये हा प्रयोग यशस्वी ठरला. *हम तुम*मध्ये करण कपूर(सैफ अली) हा कार्टूनिस्ट असतो. त्याच्या कार्टून्सचीच नावं हम आणि तुम असतात. म्हणजे एका अर्थाने हे हम-तुम कथेचे मुख्य कलाकार आहेत. कथा २० वर्षांच्या कालावधीत घडते. त्यामुळे हम-तुमवर चित्रीत दृश्यंही या कथेत चपखल बसली.

